# लोकसंगीत, लोकगीत मूल्य शिक्षणाचे अनौपचारीक साधन

प्रा. पी. जी. शिंदे
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शहादा जिल्हा नंदुरबार

वर्तमान काळात प्रबोधन, मनोरंजन व ज्ञानाचे वहन करण्यासाठी अनेक आधुनिक साधने उपलब्ध आहेत विज्ञानाच्या प्रगतीमुळे या साधनाचे महत्व व नविन्यता दिवसे दिवस वाढत आहे. प्राचीन काळात विज्ञानाच्या अल्प प्रगतीमुळे लोकांचे मनोरंजन, उद्‌बोधन व प्रबोधन करण्यासाठी अनौपचारिक शिक्षण संस्थांची मदत घेतली जात असे. लोकसाहित्याचा उपयोग करुन लोकांचे मूल्यांचे शिक्षण होत असे. मूल्य शिक्षण हे मानवा इतकेच प्राचीन आहे. वेगवेगळ्या काळात मूल्य शिक्षणासाठी वेगवेगळ्या साहित्याचा उपयोग करण्यात आला. प्राचीन काळात लोक साहित्याच्या माध्यमातून मूल्यांचे शिक्षण दिले जात असे. लोकसाहित्य ही संकल्पना व्यापक आहे लोकसाहित्यात अनेक घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचा मूल्य शिक्षणासाठी उपयोग केला जात असे. लोकसाहित्यात समाविष्ट असलेल्या घटकांची वृक्षाकृती अभ्यासल्यानंतर आपणास लोकसाहित्यातील घटकांची कल्पना येईल.

लोकसाहित्यात समाविष्ट असलेल्या लोकसंगीताचा व लोकगीतांचा मूल्य शिक्षणासाठी उपयोग केला जात असे. 'लोकांचे संगीत ते लोक संगीत' अशी सोपी व्याख्या लोकसंगीताची करता येईल. आपल्या आवडीनुसार मनोरंजनासाठी, जनांनी स्वत: तयार केलेली व स्वत:च्या प्रदेशात प्रयुक्त केलेले ते लोक संगीत होय. प्राचीन काळी किंवा मध्ययुगात लोकसंगीताचा प्रभाव सामान्य माणसावर खूप मोठ्या प्रमाणावर होता. त्या काळ लोकसंगीत मूल्य शिक्षणाचे साधन म्हणून उपयोगात आणले जात असे. लोकगीताच्या जोडीला लोकसंगीताची मदत घेऊन घरा घरातून संगीताच्या माध्यमातून संस्कार केले जात होते.

**लोकसंगीताची लक्षणे**

लोकसंगीतात गीतांचा समावेश होतो. गीत म्हणजे जे गायले जाते ते लोकसंगीतात वाद्याचा उपयोग केल जातो. लोकसंगीतातील वाद्याचीलय जास्तीत जास्त जनतेला यावी यासाठी आकाशवाणीच्या विविध भारती केंद्रावरुन दररोज दुपारी तीन वाजता विविध प्रदेशातील लोकगीताचे प्रसारण केले जाते.

व्यक्तीच्या जीवनातील जन्म, विवाह, मृत्यू अशा महत्वाच्या टप्प्यांवर व प्रसंगावर आधारीत असंख्य संस्कार गीते भारतात विविध प्रदेशात रुढ आहेत. मराठी लोकसाहित्यातही लोकगीतांची प्रदीर्घ व प्राचीन परंपरा आहेत. स्त्री गीते , जात्यावरच्या ओव्या, अंगाई गीते, डोहाळे गीते. सण उत्सवाची गाणी, खेळ गाणी, नृत्यगीते,

श्रमपरिहारार्थ गायली जाणारी भक्ती गीते अशा अनेक शाखांनी ही लोकगीत परंपरा बहरली आहे, समृध्द झाली आहे.

आपले घराणे, आपल्या घराण्याचे रीतिरिवाज,वाडवडिलांची चालरीत आणि आपले कुळाचार आपल्या घरातील सर्व सदस्यांनी स्वीकारावीत आपला सांस्कृतिक वारसा पिढ्यांपिढ्या चालू राहावा असे प्रत्येक कुटुंबीयांना वाटते. त्यासाठी मुलांच्या जन्मापासून त्यांच्यावर संस्कार केले जातात. बालपणीग्रहण केलेल्या संस्कारांना त्या-त्या विशिष्ट घराण्याची पार्श्वभूमी असते. हे संस्कार लहान मुलामुलींनी आत्मसात करावेत यासाठी वडीलधाऱ्या व्यक्ती विशेष काळजी घेतात. मुलांनी सुयोग्य संस्कार घ्यावेत यासाठी ते गीतांचे माध्यम स्वीकारतात. मुलांच्या शरीराचा, मनाचा , बुध्दीचा सुयोग्य विकास व्हावा यासाठी मुलांच्या कानांवर सतत संस्कार गीते टाकली जातात, प्रार्थना, अंगाई गीत , भावगीते इत्यादी गीते मुलांच्या कानावर सतत पडत तोच तोच विचार सतत कानावर पडत असल्यामुळे मुलांची वृत्ती आपोआप त्यानुसार होत असे. हसत खेळत संस्कार केल्या मुळे अशा संस्काराचे अनुकरण लवकर करतात. वर्तमानकाळात अनेक शिक्षणतज्ज्ञांनी बाल संस्कार केंद्रात मुलांवर संस्कार करण्यासाठी गीतांचा, संगीताचा उपयोग करावा व क्रीडन पध्दतीद्वारे मुलांना शिकवावे असे सूचविले आहे. शालेय अभ्यासक्रम मुलांना लवकर आकलन व्हावा यासाठी गीतांचा भरपूर उपयोग आज शाळांमधून केला जात आहे. आजही मातृभाषेच्या अभ्यासात लोकगीतांचा अभ्यास मुलांपुढे ठेवून संस्कार प्रक्रीया पार पाडली जात आहे.

लोकगीते व लोकसंगीत हे लोकसाहित्याचाच एक भाग आहे. लोकसाहित्यात त्यांचे स्थान नेमके कोठे आहे. हे आपणास पुढील वृक्षाकृती वरुन कळेल.




वरील वृक्षाकृतीचा अभ्यास केल्यानंतर आपल्या असे दृष्टीस येते की, वरील सर्व प्रकार आपण केव्हा ना केव्हा अनुभवले आहेत. त्याच्याद्वारे आपणासर्वांवर बालपणी संस्कार केले गेले आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे व पाश्चात्य संस्कृतीकडे आपण सर्वच भारतीय आकर्षित झाल्यामुळे आपल्या जवळ असलेल्या लोक साहित्याच्या महान वारशाचा आपणाला विसर पडला आहे.लोक संगीत व लोक साहित्याच्या माध्यमातून सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री पुरुष समानता इत्यादी मूल्यांचे बीजारोपण कसे करता येईल याचे चिंतन करण्याची आवश्यकता आहे.